पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.



# ओमानची कडवी झुंज, भारताची विजयी गुंज

## कलीम, मिर्झाची खेळी व्यर्थ



**अबू धाबी । वृत्तसंस्था**

भारताने ओमान संघाचा २१ धावांनी पराभव केला आहे. या सामन्यात ओमानच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांना चांगलेच थकवून सोडले होते. ओमानचा संघ आशिया चषकात आपला पहिला विजय मिळवण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता. १६ व्या षटकापर्यंत त्यांचा केवळ एकच गडी बाद झाला होता, पण १७ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर हार्दिक पांड्याने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण झेलमुळे सामन्याची दिशा पूर्णपणे बदलली आणि भारताने हा सामना २१ धावांनी जिंकला.

भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत ८ गड्यांच्या बदल्यात १८८ धावांचा विशाल डोंगर उभारला. भारताची सुरुवात खराब झाली. सलामीवीर शुभमन गिल अवघ्या ५ धावांवर बाद झाला, पण त्यानंतर अभिषेक शर्माने १५ चेंडूंमध्ये ३८ धावांची तडफदार खेळी करत संघाला गती दिली. त्याने धडाकेबाज फलंदाजी करत ओमानच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच दबाव आणला. पण मोठी खेळी करण्यात तो अपयशी ठरला. हार्दिक पांड्या रामानंदीच्या गोलंदाजीवर १ धाव काढून माघारी फिरला. अक्षर पटेलने १३ चेंडूंमध्ये २६ धावा करून धावगती वाढवली. तो आमिरच्या गोलंदाजीवर यष्टीरक्षक विनायक शुक्लाने झेल घेतल्याने बाद झाला.



आशिया चषक २०२५

शिवम दुबे ५ धावांवर माघारी फिरला. तेव्हा संघाने ५ गड्यांच्या बदल्यात १६ व्या षटकात १५३ धावसंख्या गाठली होती. संजू सॅमसने एका बाजूने किल्ला लढवत ४५ चेंडूंमध्ये ३ चौकार आणि ३ षटकारांसह ५६ धावांची शानदार अर्धशतकी खेळी केली. अवघड खेळपट्टीवरील त्याचा संयम वाखाणण्याजोगा होता.तिलक वर्माने सुरुवातीच्या धक्क्यातून संघाला बाहेर काढले. त्याने १८ चेंडूत २९ धावा केल्या. त्यात १ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. त्याने संजू सॅमसनसोबत एक महत्त्वाची भागीदारी केली. अर्शदीप सिंग (१), हर्षित राणा (१३*), कुलदीप यादव (१*) धावांवर नाबाद राहिले.

ओमानच्या गोलंदाजांनीही चांगली कामगिरी केली. शाह फैजल, जितेन रामानंदी आणि आमिर कलीम यांनी प्रत्येकी २ बळी घेऊन भारतीय फलंदाजांना रोखण्याचा प्रयत्न केला. कुलदीप यादवने कर्णधार जतिंदर सिंहला बाद करत भारताला पहिले यश मिळवून दिले. जतिंदरने ३२ धावांची खेळी केली. तुफान फलंदाजी करत असलेल्या आमीर कलीमला हर्षित राणाने ६४ धावांवर माघारी धाडले. तर हम्माद मिर्झा ३३ चेंडूत ५१ धावांची खेळी केली. विनायक शुक्ला (१),जकारिया इस्लाम ०*), जितेन रामानंदी (१२*) धावा करत ओमानची झुंज ४ बाद १६७ धावांवर थांबली.

## थोडक्यात

### भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया आज तिसरा सामना



**नवी दिल्ली ।** भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघांमध्ये तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेचा थरार सुरू असून, या मालिकेत दोन्ही संघांनी १-१ ने बरोबरी साधली आहे. तिसरा सामना शनिवारी (दि.२०) नवी दिल्ली येथील अरूण जेटली स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार दुपारी १.३० वाजता खेळविण्यात येणार आहे. भारतीय संघाची धुरा हरमनप्रीत कौरकडे तर ॲलिसा हिलीकडे ऑस्ट्रेलिया संघाची धुरा असणार आहे. आयसीसी विश्वचषक स्पर्धेपूर्वी दोन्ही संघांचा अखेरचा सामना असल्याने मैदानावर आत्मविश्वासाने उतरण्यासाठी दोन्ही संघ सज्ज असणार आहेत.

### जॉश इंग्लिशला दुखापत



**नवी दिल्ली ।** न्यूझीलंड विरूध्द ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघांमध्ये १,३,४ ऑक्टोबर रोजी माऊंट मांगुनाई येथे ३ टी-२० मालिका खेळविण्यात येणार आहे. या मालिकेला प्रारंभ होण्यासाठी अवघे १० दिवस शिल्लक राहिलेले असताना ऑस्ट्रेलिया संघाला मोठा धक्का बसला आहे.यष्टीरक्षक फलंदाज जॉश इंग्लिशने पाय किंवा पिंजऱ्यातील स्नायूंमध्ये आलेल्या ताणामुळे मालिकेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. आठवड्याच्या सुरुवातीला पर्थ येथे धावण्याचा सराव करत असताना त्याला समस्या जाणवू लागली होती.संघ व्यवस्थापनाने बदली खेळाडू म्हणून यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरीची निवड केली आहे.

# आजपासून सुपर-४ चा थरार

## श्रीलंका- बांगलादेश यांच्यात सलामीचा सामना

**दुबई । वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीच्या सामन्यांचा थरार आटोपल्यानंतर आता शनिवारी २० सप्टेंबरपासून सुपर ४ लढतींना सुरुवात होणार आहे. सलामी सामन्यात श्रीलंका संघासमोर बांगलादेश संघाचे आव्हान असणार आहे.

श्रीलंका क्रिकेट संघाने साखळी फेरीच्या सामन्यात हाँगकाँग, विरूध्द ४ गडी राखून विजय संपादन केला आहे. तसेच, बांगलादेश आणि अफगाणिस्तान विरूध्द ६ गडी राखून विजय संपादन करून गुणतालिकेत पहिले स्थान निश्चित केले आहे.

दुसरीकडे बांगलादेश संघाने लिटन दासच्या नेतृत्वाखाली खेळताना हाँगकाँग विरूध्द ७ गडी राखून दणदणीत विजय संपादन केला होता. मात्र, दुसऱ्या सामन्यात श्रीलंका संघाने ६ गडी राखून बांगलादेश संघाला पराभूत केले होते. मात्र अखेरच्या सामन्यात बांगलादेशाने अफगाणिस्तान विरूध्द ८ धावांनी विजय संपादन करून गुणतालिकेत ४ गुणांची कमाई करत दुसरा क्रमांक पटकावला होता. मात्र, अफगाणिस्तान विरूध्द श्रीलंका संघाने विजय संपादन करून बांगलादेश सुपर ४ मध्ये दाखल झाला आहे. हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळविण्यात येणार आहे. पहिल्या साखळी फेरीच्या सामन्यातील पराभवाचा वचपा काढण्यासाठी बांगलादेश मैदानावर उतरणार आहे.

श्रीलंका- बांगलादेश यांच्यात २१ सामने खेळविण्यात आले असून, श्रीलंकाने १३-८ फरकाने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. श्रीलंका संघाबद्दल बोलायचे झाल्यास पथुम निसांकाने ३ सामन्यात १२४ धावा केल्या असून, तो श्रीलंका संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. हाँगकाँग आणि बांगलादेश विरूध्द साखळी फेरीच्या पहिल्या दोन सामन्यात अपयशी ठरलेल्या कुशल मेंडिस लयीत परतला आहे. गोलंदाजीत नुवान तुषारा, वनिंदु हसरंगा, दुष्मंता चमिरा, दसून शनाका, दुनिथ वेललागे सर्व गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली आहे.

बांगलादेशाबद्दल बोलायचे झाल्यास, लिटन दास, झाकिर अली, तौहिद हिरडॉय, तंझीद हसन या सर्व खेळाडूंनी फलंदाजी मध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. गोलंदाजीत नसूम अहमद, रिशाद हुसेन, मुस्तफिझूर रहेमान, टसकीन अहमद, तंझीद हसन शकिब या सर्व गोलंदाजांनी सामन्याच्या निर्णायक टप्प्यावर बळी मिळवून दिले आहेत. दोन्ही संघांनी आपल्या अखेरच्या सामन्यात विजय संपादन केला असल्याने एकमेकांना कडवी झुंज देण्याचा दोन्ही संघांचा प्रयत्न असणार आहे.

# दिशाली, राधा, प्रणव, सोहम यांना विजेतेपद

## नाशिक जिल्हा कॅरम स्पर्धा

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्हा कॅरम असोसिएशन आणि डी. एस. एफ. स्पोर्टस् फाउंडेशन यांच्या वतीने आणि कोहिनूर इंटरनॅशनल स्कूल यांच्या सहकार्याने क्रीडा संघटक आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू हेमंत पांडे यांच्या वाढदिवसानिमित्त पंचवटी येथे ज्युनियर गटांच्या मुला - मुलींच्या जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा झाल्या.

या स्पर्धेत १४ वर्षे आणि १७ वर्षे मुले आणि मुली यांचा समावेश होता. या स्पर्धेत सोहम पवार, प्रणव रामजाली, अपेक्षा सोनावणे आणि दिशाली बलदवा यांनी आपल्या गटामध्ये विजेतेपदाला गवसणी घातली.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण क्रीडा संघटक राजीव पाटील यांच्या हस्ते आणि आनंद खरे, राजू शिंदे, दीपक निकम, आनंद चकोर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या स्पर्धेची तांत्रिक बाजू भूषण भटाटे, अभिषेक मोहिते, भारत खत्री, प्रधान सर, नकुल चावरे, उत्कर्ष परदेशी आणि इतर सहकारी यांनी यशस्वीपणे सांभाळली.



### अंतिम निकाल

**१४ वर्षे मुले** - सोहम पवार - प्रथम, आदेश वसावे - द्वितीय, कार्तिक गोडबोले - तृतीय, राम जयस्वाल - चतुर्थ

**१४ वर्षे मुली** - राधा खर्डे - प्रथम, अपेक्षा सोनावणे - द्वितीय, रुही समीर पठाण - तृतीय, फातेमा एजाज मणियार - चतुर्थ

**१७ वर्षे मुले** - प्रणव रामजाली - प्रथम, श्रीराज कुमावत - द्वितीय, यश कानकाटे - तृतीय, आर्यन उमाळे - चतुर्थ

**१७ वर्षे मुली** - दिशाली बलदवा - प्रथम, तनुजा गाढवे - द्वितीय, गौरी तेलंगड - , तृतीय, दीपाली थोरात - चतुर्थ

# सिंधू स्पर्धेतून बाहेर

## चीन मास्टर्स

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूला चीन मास्टर्स २०२५ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या एन. से. यंगकडून सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला. ही लढत शुक्रवारी शेन्झेन अरेना येथे झाली.

पॅरिस ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या एन. से. यंगने दोन वेळच्या ऑलिंपिक विजेत्या सिंधूविरुद्ध आपला विजयी धडाका कायम ठेवला.



सिंधूला तिच्याकडून हा सलग आठवा पराभव पत्करावा लागला आहे.फक्त ३८ मिनिटे चाललेल्या या सामन्यात सिंधूला २३ वर्षीय कोरियन खेळाडूने १४-२१,

### एन.से.यंगकडून सलग आठवा पराभव

१३-२१ असे हरवले. सिंधूचा एन. से. यंगकडून हा सलग आठवा पराभव आहे आणि तिला अद्याप तिच्याविरुद्ध एकही विजय मिळवता आलेला नाही. पहिल्या गेममध्ये सिंधूची सुरुवात खराब झाली, ती सुरुवातीला १-६ अशी पिछाडीवर होती. मात्र, एका चांगल्या ड्रॉप शॉटमुळे तिने ५-९ अशी पिछाडी भरून काढली. त्यानंतर एन. से. यंगने आपल्या जोरदार स्मॅशचा वापर करून मध्यांतराला ११-५ अशी आघाडी घेतली. सिंधूने ही पिछाडी ११-१४ पर्यंत कमी केली, परंतु कोरियन खेळाडूने आपली पकड कायम ठेवली आणि सिंधूने एक शॉट नेटमध्ये मारल्याने पहिला गेम जिंकला.



# भारत-अमेरिका व्यापार चर्चा प्रगतिपथावर

## परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

अमेरिकेकडून भारतावर लादण्यात आलेल्या टॅरिफच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल यांनी भारत आणि अमेरिके दरम्यानच्या व्यापार कराराबाबतची चर्चा सकारात्मक दिशेने पुढे जात असल्याची माहिती दिली आहे. त्यांनी सौदी अरेबिया आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या करारावरही भारताची भूमिका स्पष्ट केली.



जायसवाल यांनी सांगितले की, १६ सप्टेंबर २०२५ रोजी अमेरिकेचे सहाय्यक व्यापार प्रतिनिधी ब्रेंडन लिंच यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन शिष्टमंडळाने भारताच्या वाणिज्य मंत्रालयात बैठक घेतली. ही चर्चा अतिशय सकारात्मक आणि दूरदृष्टी ठेवून झाली. दोन्ही देशांमधील व्यापार कराराच्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचारविनिमय झाला. दोन्ही बाजूंनी लवकरच परस्पर हिताचा करार करण्यासाठी प्रयत्न अधिक गतिमान करण्याचे ठरले आहे.१७ सप्टेंबर २०२५ रोजी वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनीही भारत-अमेरिका व्यापार चर्चा योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले होते. अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत सुमारे सात तास चाललेल्या बैठकीनंतर, परस्पर फायदेशीर असा व्यापार करार शक्य तितक्या लवकर अंतिम करण्याचे ठरले, असे वाणिज्य मंत्रालयाने स्पष्ट केले.

### सौदी-पाकिस्तान करारावर भारताची भूमिका

सौदी अरेबिया आणि पाकिस्तानदरम्यान झालेल्या करारावर भारताची भूमिका विचारली असता, जायसवाल म्हणाले, भारत आणि सौदी अरेबियामध्ये एक व्यापक धोरणात्मक भागीदारी आहे आणि ती गेल्या काही वर्षांमध्ये अधिक मजबूत झाली आहे. या भागीदारीत दोन्ही देशांच्या हितसंबंधांचा आणि संवेदनशील मुद्द्यांचा पूर्णपणे विचार केला जाईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.

## निवडक

### ग्रंथालयांचे अनुदान आता बँक खात्यात

**मुंबई ।** राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सहाय्यक परीक्षण अनुदानाचा पहिला हप्ता थेट ग्रंथालयांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी दिली. ग्रंथालयांना अनुदान वेळेत वितरित व्हावे म्हणून विभागाने आणि ग्रंथालय संचालनालयाने संगणकाधारित 'ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली' विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे अनुदानाचे वितरण प्रक्रिया पारदर्शक झाली आहे. यावर्षी पहिल्या हप्त्यासाठी सरकारने निधी मंजूर केला असून त्याअंतर्गत एकूण ८० कोटी ५३ लाख ६७ हजार इतकी देयके मंजूर करून राज्यातील १० हजार ५४६ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना थेट त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्यात येत आहे, असे पाटील यांनी सांगितले.

### संघाला संविधान भेट देणार

**मुंबई ।** येत्या २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान नागपूर येथे संविधान सत्याग्रह यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा दिक्षाभूमीपासून सुरु होऊन सेवाग्रामपर्यंत जाणार आहे. २८ तारखेला क्रांतिवीर भगतसिंह यांच्या बलिदानदिनी मशाल मोर्चा काढला जाणार असून, संविधान चौकात एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# राहुल गांधी हे 'अर्बन नक्षल'

## मुख्यमंत्री फडणवीस यांची टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा मेंदू चोरीला गेला आहे. त्यांना देशाच्या संविधानाप्रती कोणतीही आस्था नाही. संवैधानिक व्यवस्थेला ते नाकारतात. जेन झीने येऊन सरकार उलथवून टाकावे, अशी भाषा करून त्यांनी तर आता ते 'अर्बन नक्षल' असल्याचा पुरावा दिल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलताना केली. राहुल गांधी अर्बन माओवाद्यांची भाषा करत आहेत. त्यांचे सगळे सल्लागार हे अर्बन माओवादी विचारधारेचे आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी मतचोरीचा आरोप झाल्याचा दावा केला होता. या पार्श्वभूमीवर बोलताना फडणवीस म्हणाले, भारताची जेन झी ही देशाच्या संविधानावर विश्वास ठेवते. भारताची जेन झी ही स्टार्टअपची इकोसिस्टिम चालवणारी आहे. तंत्रज्ञान जाणणारी जेन झी आहे. त्या माध्यमातून देशाला जगात पुढे कसे न्यायचे हे जाणणारी जेन झी आहे. राहुल गांधी न जेन झी ला जाणतात, ना युवक वा ज्येष्ठ नागरिकांना जाणतात.

# गाझा युद्धबंदी प्रस्तावाला अमेरिकेचा नकाराधिकार

**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**

अमेरिकेने गुरुवारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत गाझामध्ये तात्काळ युद्धबंदी आणि ओलिसांच्या सुटकेची मागणी करणाऱ्या ठरावाला नकाराधिकार वापरून फेटाळले. अमेरिकेने असा दावा केला की, या ठरावामध्ये हमासला फायदा पोहोचवणाऱ्या चुकीच्या कथांना वैध ठरवण्यात आले आहे, ज्या दुर्दैवाने या परिषदेत प्रचलित झाल्या आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतील उर्वरित १४ सदस्यांनी या ठरावाच्या बाजूने मतदान केले. त्यांनी गाझामधील मानवी परिस्थितीचे वर्णन भयानक असे केले. तसेच, त्यांनी इस्रायलला २.१ दशलक्ष पॅलेस्टिनी नागरिकांसाठी सर्व मदत निर्बंध उठवण्याचे आवाहन केले.

मतदानापूर्वी बोलताना, अमेरिकेचे प्रतिनिधी मॉर्गन ऑर्टागस म्हणाले की, हा ठराव हमासला मदत देऊन आणि नागरिकांच्या गरजांकडे दुर्लक्ष करून स्वतःला मजबूत करण्याची संधी देणाऱ्या अयशस्वी व्यवस्थेकडे परत जाण्याचा प्रयत्न करत आहे. हे मतदान न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या बैठकीपूर्वी झाले आहे, जिथे अमेरिकेचे काही मित्र देश स्वतंत्र पॅलेस्टिनी राज्याला मान्यता देण्याची शक्यता आहे.

# उत्तराखंडमध्ये भूस्खलन आणि पूर

## चमोली जिल्ह्यात बचावकार्याला वेग

**देहरादून । वृत्तसंस्था**

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील नंदनगर परिसरात मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि पूर आल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

या घटनेनंतर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान बचाव आणि मदतकार्यात युद्धपातळीवर गुंतले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नंदनगरमधील एका गावात भूस्खलनामुळे अनेक घरांचे नुकसान झाले आहे.

सततच्या पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत, ज्यामुळे अनेक भागांमध्ये पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे.एसडीआरएफच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले आहे. अनेक ठिकाणी अडकलेल्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे काम सुरू आहे. स्थानिकांना सुरक्षितस्थळी पोहोचवण्यासाठी आणि बाधित गावांमध्ये आवश्यक मदत पुरवण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांनी मदतीच्या सूचना केल्या आहेत.



देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : * **शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ☎ : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६. ● Mail id : ceditor@deshdoot.com

cmyk